संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

पसंतीवर आधारीत श्रेयांक पद्धती **(CBCS)** अभ्यासक्रम २०२२-२३

**Generic Open Elective Course**

**Communication Skill in Marathi**

संवाद कौशल्ये

- Generic open elective courses are to be designed for Values, ethics, spirit of Indian constitution, teaching of social saints etc.
- The courses of communication skills under GOEC will have PSO, CO and course contents from that perspective.
- The communication with downtrodden, marginalized section of society should lead to dignity of individual, harmony and dignity of labor.
- Hence the course contents should have teaching, preaching, communication style of social saints like Sant Gadge Baba, Rashtra Sant Tukodoji Maharaj, skills to communicate with labors, domestic helps, marginalized sections including third genders, LGBT community, people from different strata of society.
- Expressing dignity of individual and dignity of labour, connecting masses should be thrust or focus of course contents in GOEC-communication skills in Marathi. Regards

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

पसंतीवर आधारीत श्रेयांक पद्धती **(CBCS)** अभ्यासक्रम २०२२-२३

**Generic Open Elective Course**

**Communication Skill in Marathi**

संवाद कौशल्ये

**प्रस्तावना (Preamble) :**

मानवाच्या जीवनात भाषा ही महत्त्वपूर्ण बाब आहे. मानवाचा विकास होण्यास, त्याचे व्यक्तिमत्त्व खुलून दिसण्यास भाषा अधिक परिणामकारक घटक आहे. दोन किंवा अधिक व्यक्ती एकत्र आल्या की, ते एकमेकांशी बोलतात. त्यालाच संवाद किंवा संभाषण असे म्हणतात. संवादाच्या माध्यमातून विचारांची देवाणघेवाण होत असून व्यक्तीच्या विचारांना चालना मिळते. वर्तमान हे दररोज निरनिराळ्या प्रश्नांना आणि समस्यांना घेऊन आपल्यासमोर उभे राहत आहे. हे प्रश्न केवळ सामाजिक अथवा आर्थिक नाहीत, तर जीवनाच्या सगळ्याच क्षेत्रांना व्यापणारे आहेत. किंबहुना मानवी जीवनाच्या अस्तित्वालाच आव्हान देणारे आहेत. अशावेळी केवळ जीवन जगणे हाच पर्याय नाही, तर सन्मानाचे जीवन आपल्या वाट्याला यावे यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. आपल्या अंगी असणाऱ्या सर्जनशक्तीचा योग्य वापर करणे, स्वतःच्या ठायी असणाऱ्या कौशल्यांचा विकास करणे, नवी कौशल्ये जाणीवपूर्वक आत्मसात करणे दिवसेंदिवस अपरिहार्य होत जाणार आहे.

हे वास्तव लक्षात आल्यामुळे शिक्षण क्षेत्रात मागील काही वर्षांत झपाट्याने बदल होत आहेत. अर्थकारणाची दिशा समजून घेऊन विद्यार्थी स्वतःला कसे सिद्ध करेल, याकडे विशेष लक्ष दिले जात आहे. विद्यार्थी हा ज्ञानवंत, प्रज्ञावंत तर व्हायलाच हवा, सोबतच तो कलावंत व्हावा, परंतु मानवी जीवनात श्रम अधिक महत्त्वाचे आहेत. म. गांधींनी श्रमाची प्रतिष्ठा आपल्याला सांगितली आहे. आजकाल बुद्धिजीवी वर्गाकडून श्रमाला कमी महत्त्व दिले जात आहे. ही चिंतनीय बाब आहे. बौध्दिक विकासाबरोबर शारीरिक विकासही महत्त्वाचा असतो. मोठमोठे उद्योगधंदे केवळ बौध्दिक विकासावरच अवलंबून असतात असे नव्हे तर कुशल-अकुशल श्रमिकांचे परिश्रमही त्यासाठी महत्त्वपूर्ण असतात. समाजात श्रम प्रतिष्ठेला यासाठी महत्त्वाचे स्थान दिले पाहिजे की, समाजातील प्रत्येक व्यक्ती महत्त्वाचा आहे. श्रमप्रतिष्ठा हे एक असे मूल्य आहे की, ज्याद्वारे व्यक्तीचा, समाजाचा व राष्ट्राचा योग्य दिशेने विकास होऊ शकतो. यामध्ये केवळ तात्विक बाब महत्त्वाची नसून श्रमाची कृतीशीलता महत्त्वाची आहे. श्रमाच्या कृतीशीलतेच्या जोरावरच विद्यार्थी आपल्या जीवनाला नवी दिशा देऊ शकतात. श्रमाच्या क्षमतेतून सर्वांगीण विकासाच्या क्षमता निर्माण होतात. माणूस म्हणून जगण्यासाठी मानवतेच्या दृष्टीकोनातून सर्वांगीण विकास होऊ शकतो. आम्ही सर्व एक आहोत. मानवता हाच खरा धर्म आहे हा विचार पेरण्याचे काम संवादाच्या माध्यमातून करता येईल. मानवी मूल्यांची जपवणूक करणे, ती समाजात रूजविणे, आणि योग्य प्रकारचे संस्कार मूल्य निर्माण करणे त्या करिता

संवाद कौशल्ये अतिशय महत्त्वाची ठरतील. समाजातील माणसाला माणसाशी जोडण्यासाठी त्यांच्या विचारांची आदान-प्रदान करण्यासाठी, भावना अभिव्यक्त करण्यासाठी त्यातील चांगले संस्कार मूल्य जपण्यासाठी संवाद कौशल्ये अतिशय महत्त्वपूर्ण ठरतील.

**अभ्यासक्रमाची निष्पत्ती (POS) :**

१) मानवी मूल्यांची जपवणूक करता येईल.

२) श्रमाच्या प्रतिष्ठेचे महत्त्व समजावून सांगण्यासाठी संवाद कौशल्ये महत्त्वाची ठरतील.

३) संतांनी सांगितलेल्या मानवतेच्या विचारांचा वारसा पुढे नेता येईल.

४) संवादाच्या माध्यमातून मानवी मूल्यांची रूजवणूक होण्यासाठी महत्त्व होईल.

५) स्वातंत्र्य, समता, बंधूता, न्याय ही सामाजिक मूल्य आत्मसात करता येतील.

६) विवेकशील सद्‌गुणी व सुयोग्य नागरिक निर्माण करण्यासाठी मदत होईल.

७) मानवी मूल्यातून आत्मविष्काराची निर्मिती होईल.

८) संवाद कौशल्याच्या माध्यमातून मानवतेचा विचार जोडता येईल. चारित्र्य व श्रमप्रतिष्ठा या तत्त्वांना प्राधान्य प्राप्त होईल.

९) विद्‌यार्थ्यांचा नैतिक विकास करणे, मूल्यसंस्कारातून चारित्र्य संपन्न व्यक्तिमत्त्व घडविणे व त्यातून श्रमाधिष्ठीत व्यवस्था निर्माण करणे.

**अभ्यासक्रमाची विशिष्ट निष्पत्ती (PSOS) :**

१) विविध प्रकारच्या संवाद कौशल्यांच्या माध्यमातून विद्‌यार्थ्यांच्या अंगी सर्जनशीलता निर्माण होईल.

२) संवाद कौशल्याच्या माध्यमातून व्यवहारिक व उपयोजित ज्ञान विद्‌यार्थ्यांना प्राप्त होईल.

३) संवाद कौशल्यांच्या विविध घटकांची माहिती विद्‌यार्थ्यांना होईल.

४) संवाद कौशल्यांच्या तंत्रातून सर्जनशीलता, विपणन कौशल्य, व्यवस्थापन कौशल्य यासारख्या विविध कौशल्याचे ज्ञान प्राप्त होईल.

५) संवाद लेखनाच्या तंत्राने लेखन क्षमता अभिव्यक्त होईल.

६) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व संत गाडगे बाबा यांच्या संवाद शैलीच्या अभ्यासाने संवादाचे नवे तंत्र विकसित होईल व मानवी मूल्यांची जोपासना होईल.

७) संवाद कौशल्याच्या माध्यमातून समाजात काम करणाऱ्या विविध वर्गातील लोकांचा परिचय होईल.

८) संवाद कौशल्याच्या माध्यमातून व्यवसाय कौशल्य, विचार कौशल्य, संस्कार कौशल्य, श्रमप्रतिष्ठा कौशल्य निर्मिती होईल.

**Generic Open Elective Course**
**Communication Skill in Marathi**
अभ्यासक्रम संवाद कौशल्ये

**नेमलेले पाठ्यपुस्तक : संवाद कौशल्ये :** डॉ. गणेश मालटे, डॉ. ममता इंगोले,
अथर्व पब्लिकेशन्स, जळगाव

**अभ्यासपत्रिकेची निष्पत्ती (COs) :**

१) अभ्यासक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची विविध संवाद कौशल्ये यांचा पाया मजबूत होईल.
२) संवाद कौशल्यांची आकलन क्षमता वाढेल.
३) संवाद कौशल्याने ज्ञानाची विविध क्षेत्र खुली होतील.
४) संवाद कौशल्याने आत्मभान प्राप्त होईल.
५) विविध क्षेत्रातील ज्ञानाच्या कक्षा रुंदावतील.
६) सामाजिक, जाणिवेचे भान प्राप्त होतील.
७) मानवी मूल्यांची रूजवणूक होईल.
८) श्रमाची प्रतिष्ठा प्रस्थापित होण्यास मदत होईल.

| अ.क्र. | अभ्यासपत्रिकेचे घटक | नेमलेले तास प्रति आठवड्याला दोन तास (एकूण ३० तास) | श्रेयांक 2 Credits |
|---|---|---|---|
| १ | प्रास्ताविक, संवाद म्हणजे काय? प्रत्यक्ष संवाद, अप्रत्यक्ष संवाद, औपचारिक संवाद, अनौपचारिक संवाद निवेदन, वक्तृत्त्व, ई - संवाद. | दहा तासिका | 02 |
| २ | संवाद कौशल्यासाठी आवश्यक घटक - वाचन - आशयाकडे लक्ष देणे, आधी आकलन नंतर मूल्यमापन, एकाग्रता, भावनिक अडथळा, विचार-उच्चार वेग, चिंतन-मनन, श्रवण, व्याख्या, श्रवण प्रक्रिया व त्या प्रक्रियेची अंगे, लक्षपूर्वक ऐकणे, संदर्भ लक्षात घेणे, भाषाशैलीकडे लक्ष देणे., श्रवणाचे उद्देश - श्रवण करावे लागणे, ज्ञानार्जन, मनोरंजन, सामाजिक आंतरक्रियेचा भाग, सृजनशीलतेचा विकास, भाषा विकास | | |
| ३ | संवाद कौशल्याचे प्रकार - आत्मसंवाद, दुहेरी संवाद, गट संवाद किंवा जनसंवाद, मौखिक संवाद, अमौखिक संवाद. | | |
| ४ | संवाद कौशल्याचे तंत्र - अभ्यास, शब्दसंग्रह, मांडणी, देहबोली, भाषण, सादरीकरण, मुलाखत, प्रभावी नेतृत्व, जनसंपर्क, | दहा तासिका | |

| | | | |
|---|---|---|---|
| | सर्जनशीलता, विपणन कौशल्य, व्यवस्थापन कौशल्य, मेहनती वृत्ती | | |
| ५ | संवाद लेखनाचे तंत्र- चित्रपट व मालिकांसाठी संवाद लेखन, नभोवाणीसाठी संवाद लेखन. | | |
| ६ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची संवाद शैली | | |
| ७ | गाडगे बाबांची संवाद शैली | दहा तासिका | |
| ८ | संवाद शैलीचा नमुना - अखेरचे कीर्तन | | |
| ९ | संवाद कौशल्याचे नमुने | | |

**मूल्यमापन/कृतिशील उपक्रम :**

१) आपल्या परिसरातील श्रमजीवी वर्गातील घटकांची मुलाखत घेऊन त्यांच्या समस्या/अडचणी आपल्या शब्दात व्यक्त करा.

२) समाजातील बहिष्कृत घटकांच्या मुलाखती घेणे (उदा. तृतीय पंथी, भटके विमुक्त, आदिवासी, समाजातील इतर घटक)

३) यशस्वी लघु उद्योजकांची मुलाखत, उत्कृष्ट शेतकरी मुलाखत, एखाद्या क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या युवकांची मुलाखत, समाजातील विविध क्षेत्रात काम करणाऱ्या स्त्रियांच्या मुलाखती.

४) सहकार, अध्यात्म, क्रीडा, सांस्कृतिक, साहित्य या क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तिंच्या मुलाखती.

५) महिला बचतगटात काम करणाऱ्या यशस्वी महिलांच्या मुलाखती. समाजातील विविध घटकांसाठी काम करणाऱ्या व्यक्तिंच्या मुलाखती अथवा त्यांच्यासाठी काम करणाऱ्या मान्यवरांच्या मुलाखती अथवा कृतिशील उपक्रम राबवावे.

| **गुण विभागणी** | **(एकूण ५० गुण)** |
|---|---|
| घटक चाचणी (नेमलेल्या अभ्यासक्रमानुसार) | २५ गुण |
| चर्चासत्र/मुलाखत | ०५ गुण |
| प्रात्याक्षिक (कृतिशील उपक्रमावर) | २० गुण |
| **एकूण** | **५० गुण** |